# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.१६/०८/२०२२

## जाहीर आवाहन

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यात “स्वराज्य महोत्सव” कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे शासन पत्रक क्र.संकीर्ण-८२२२/प्र.क्र.२४४/सा.का.४, दि.१०.०८.२०२२ नुसार करण्याचे आयोजिले आहे. “स्वराज्य महोत्सव” अंतर्गत राज्य स्तरावरील कार्यक्रमाच्या नियोजनामधील “समूह राष्ट्रगीत गायन” हा उपक्रम दि.१७ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता राबवायचा आहे.

तरी महानगरपालिकेतील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, बुधवार दि.१७ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आपण आहात त्या ठिकाणी थांबून ‘राष्ट्रगीत’ गायन करावे. तसेच सर्व शासकीय व खाजगी शाळा, महाविद्यालये, शिक्षण संस्था, खाजगी आस्थापना, व्यापारी संस्था, विविध सामाजिक संस्था, निवासी सोसायट्या इ. मधील सर्व नागरिकांनी त्या त्या ठिकाणच्या मोकळया जागेत, हॉल मध्ये एकत्र उपस्थित राहून समूह राष्ट्रगीत गायन करावे. दि.१७ ऑगस्ट, २०२२ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता ‘राष्ट्रगीत’ गायनाला सुरुवात होईल. समूह राष्ट्रगीत गायनाच्या वेळी राष्ट्रगीताचा अवमान होऊ नये, याची दक्षता सर्व नागरिकांनी कृपया घ्यावी. ही विनंती.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**